# अप्रत्यक्ष कर

## वस्तू आणि सेवा करात लक्षणीय प्रगती

- महामारी असूनही वस्तू आणि सेवा कराचा उत्साहवर्धक महसूल – या वृध्दीसाठी करदाते प्रशंसेला पात्र

## विशेष आर्थिक क्षेत्र

- एसईझेडचे सीमाशुल्क प्रशासन संपूर्णतः माहिती तंत्रज्ञान संचालित असेल आणि सीमाशुल्क राष्ट्रीय पोर्टलवर कार्य करेल, जे 30 सप्टेंबर 2022 पासून अंमलात येईल.

## सीमाशुल्क सुधारणा आणि शुल्क दर बदल

- फेसलेस सीमा शुल्क पूर्णपणे आकाराला आले आहे. कोविड-19 महामारी दरम्यान सीमा शुल्क विभागाने विपरीत परिस्थितीतही चापल्य आणि संकल्प यांचे दर्शन घडवत असाधारण आघाडीचे कार्य केले आहे.

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE

## प्रकल्प आयात आणि भांडवली वस्तू

- भांडवली वस्तू आणि प्रकल्प आयातीसंदर्भातले सवलतीचे दर टप्प्याटप्प्याने हटवत आणि 7.5 टक्के माफक शुल्क लावण्याचा प्रस्ताव; देशांतर्गत क्षेत्र आणि मेक इन इंडियाच्या वृध्दीसाठी पोषक
- देशात निर्मिती होत नाही अशा प्रगत यंत्रसामग्रीसाठी विशिष्ट सूट जारी राहील.
- भांडवली वस्तूंच्या देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी बॉल स्क्रू, लिनियर मोशन गाईड यावर काही सूट देण्यात येत आहे.

## <u>सीमाशुल्क सूट आणि शुल्क सुलभीकरण यांचा आढावा</u>

- 350 हून अधिक **सूट** संदर्भातिले **प्रस्ताव हळूहळू हटवण्यात येतील**, कृषी उत्पादने, रसायने,वस्त्र,वैधकीय उपकरणे आणि औषधे यांचा समावेश आहे, ज्यांची देशांतर्गत पुरेशी क्षमता आहे.
- रसायने, खते आणि धातू यासारख्या क्षेत्रात सीमाशुल्क आणि शुल्क रचना सुटसुटीत करण्याने, विवाद कमी राखल्याने तसेच भारतात निर्मिती होऊ शकणाऱ्या वस्तूंवरची सुट हटवल्याने मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत अभियानाला बळकटी मिळेल.

## <u>क्षेत्रनिहाय प्रस्ताव</u>

### <u>इलेक्ट्रोनिक्स</u>

- इलेक्ट्रोनिक्स स्मार्ट मीटर, ऐकणे किंवा धारण करण्यायोग्य उपकरणांच्या देशांतर्गत निर्मितीला सुलभ करण्याच्या दृष्टीने श्रेणी बध्द दर निश्चित करण्यासाठी सीमाशुल्क दर कॅलिब्रेट केले जातील.
- अधिक वृध्दी असणाऱ्या इलेक्ट्रोनिक वस्तूंच्या देशातल्या निर्मितीसाठी, मोबाईल फोन चार्जर ट्रान्सफोर्मरचे भाग, मोबाईल कॅमेरा मोड्यूलच्या कॅमेरा लेन्स आणि विशिष्ट इतर वस्तूंसाठी शुल्कात सूट देण्यात येईल.

the_thinking_treet3
THRIVING FOR SUSTAINABLE FUTURE